# मंत्रिमंडळ निर्णय

दिनांक : ३ मे २०१८

( बैठक क्र. १७५ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १. | मागास प्रवर्ग-ईबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम देण्याचा निर्णय | सामाजिक न्याय |
| २. | अध्यादेश काढण्यास मान्यता<br>उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला कवयित्री बहिणाबाईंचे नाव | उच्च व तंत्रशिक्षण |
| ३. | उच्च न्यायालयातील कक्ष अधिकाऱ्यांना मंत्रालयीन संवर्गाप्रमाणे वेतन मिळणार | विधि व न्याय |

सामाजिक न्याय विभाग

## मागास प्रवर्ग-ईबीसी विद्यार्थ्यांच्या
## शिष्यवृत्तीची रक्कम देण्याचा निर्णय

राज्यातील विविध महाविद्यालये-शैक्षणिक संस्थांमध्ये २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या मागास प्रवर्ग आणि आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची (शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क आणि निर्वाह भत्ता) प्रलंबित रक्कम वितरित करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या रक्कमेतील निर्वाह भत्त्याची रक्कम पात्र विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यावर तर शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्काची रक्कम संबंधित महाविद्यालय अथवा शैक्षणिक संस्थेला ऑफलाईन पद्धतीने वितरित केली जाणार आहे.

मागासप्रवर्ग आणि आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिक्षण व परीक्षा शुल्काची रक्कम प्राप्त होऊ न शकलेल्या महाविद्यालय-शैक्षणिक संस्थांना केवळ २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी काही अटी व शर्तींवर प्रलंबित रक्कम देण्यात येणार आहे. महाविद्यालयांकडील प्रवेशित पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांपैकी आजअखेर लाभ देण्यात आलेले विद्यार्थी वगळून उर्वरित विद्यार्थ्यांच्या पात्र अभ्यासक्रमांसाठी देय होणारी रक्कम चार आठवड्यात दिली जाईल.

-----o-----

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

अध्यादेश काढण्यास मान्यता

## उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला
## कवयित्री बहिणाबाईंचे नाव

जळगाव येथील उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव असा नामविस्तार करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्र्यांनी केलेल्या घोषणेनुसार याबाबतचा अध्यादेश काढण्यासही या बैठकीत मान्यता देण्यात आली.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा नामविस्तार करून या विद्यापीठास थोर कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी विविध संघटना, लोकप्रतिनिधी व मान्यवरांनी शासनाकडे केली होती. लोकभावना लक्षात घेऊन मुख्यमंत्र्यांनी २२ मार्च २०१८ रोजी अर्थसंकल्पीय अधिवेशनात याबाबतची घोषणा केली होती. आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत नामविस्ताराचा अध्यादेश काढण्यास मान्यता देण्यात आली. या अध्यादेशानुसार हे विद्यापीठ येत्या ११ ऑगस्ट या बहिणाबाईंच्या जन्मदिनापासून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या नव्या नावाने ओळखले जाणार आहे. त्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६ मधील अनुसूचीच्या भाग-१ मधील अनुक्रमांक ८ मध्ये तशी सुधारणा करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठाचा नामविस्तार करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६ मध्ये दुरुस्ती करण्यासाठी विधानमंडळासमोर सादर करावयाच्या अध्यादेशाच्या मसुद्यासही मान्यता देण्यात आली .

-----o-----

## उच्च न्यायालयातील कक्ष अधिकाऱ्यांना मंत्रालयीन संवर्गाप्रमाणे वेतन मिळणार

मुंबई उच्च न्यायालय आणि या न्यायालयाच्या नागपूर, औरंगाबाद आणि पणजी येथील खंडपीठातील कक्ष अधिकाऱ्यांना मंत्रालयातील कक्ष अधिकाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. ही वेतनश्रेणी १ जानेवारी २००६ पासून मंजूर करण्यात आली असून तिचे प्रत्यक्ष लाभ १ फेब्रुवारी २०१३ पासून देण्यात येणार आहेत.

मंत्रालयीन संवर्गातील कक्ष अधिकाऱ्यांना ९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन ४४०० तसेच चार वर्षानंतरच्या नियमित सेवेनंतर ९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन ५४०० याप्रमाणे वेतनश्रेणी देण्यात येत होती. मात्र, ११ फेब्रुवारी २०१३ च्या शासन निर्णयानुसार या कक्ष अधिकाऱ्यांना १ जानेवारी २००६ पासून ९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन ४८०० आणि चार वर्षांच्या नियमित सेवेनंतर १५६००-३९१०० अधिक ग्रेड वेतन ५४०० ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली होती. हीच वेतनश्रेणी उच्च न्यायालयातील कक्ष अधिकाऱ्यांना लागू करण्याची मागणी होती. त्यानुसार कार्यरत व सेवानिवृत्त कक्ष अधिकाऱ्यांना १ जानेवारी २००६ ते १ जानेवारी २०१३ पर्यंतच्या कालावधीत काल्पनिक वेतनवाढ मंजूर करण्यात येणार आहे तर १ फेब्रुवारी २०१३ पासूनचे लाभ प्रत्यक्ष देण्यात येणार आहेत. परंतु, १ जानेवारी २००६ ते १ जानेवारी २०१३ पर्यंतचे वेतन आणि भत्त्यांची कोणतीही थकबाकी दिली जाणार नाही. उच्च न्यायालयाच्या पणजी येथील अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी १ जानेवारी २०१४ पासून गोवा नागरी सेवा कायदा लागू झाल्याने तेथील कक्ष अधिकाऱ्यांना ३१ डिसेंबर २०१३ पर्यंतच लाभ देण्यात येतील.

-----o-----